
ISSN 2394-5303

# Printing Area

International Multilingual Research Journal

Issue-19, Vol-01, July 2016



Editor

Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

33) पंचायतराज व्यवस्थेतून पंचायत समितीतील रहिवासींच्या जीवनमान व राहणीमानात झालेले परीवर्तन
डॉ.निलेश र. निंबाळकर, जळगांव जामोद जि.बुलडाणा || 141

34) डॉ. अरुणा रामचंद्र ढेरे यांच्या कवितेतील मिथकदृष्टी
**माधवी चंद्रशेखर भट, प्रा. डॉ. श्याम मोहरकर, चंद्रपूर, महाराष्ट्र** || 146

35) लोक संगीतातील सामूहिकता
**प्रा. डि. एम. मोहोड, बार्शिटाकळी, जि. अकोला.** || 153

36) लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या दलित आत्मकथनातील समाजदर्शन
प्रा.डॉ.सौ.वंदना वि. नढे, जुन्नर, जि.पुणे || 154

37) तलासरी तालुक्यातील ख्रिश्चन मिशनरीचे शैक्षणिक कार्य
**प्रा. रा. ना. पवार, तलासरी, जि. पालघर.** || 157

38) लातूर जिल्ह्यातील गळीत धान्य पिकाखालील क्षेत्र
**शेळके मन्मथ केरबा, कोरे गोरख माधवराव, उदगीर, जि.लातूर** || 160

39) आदिवासी मराठी साहित्य काळाची गरज
**प्रा.आर.एच.सोनटक्के, धानोरा जि गडचिरोली.** || 163

40) भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे स्थान
प्रा. मदन शेळके, उदगीर जि. लातूर || 166

41) चुनावी राजनीति एवं मतदान व्यवहार : विधान सभा चुनाव २०१२ का वैयक्तिक अध्ययन
डॉ० प्रकाश चन्द्र || 170

42) सामाजिक न्याय एवं न्यायपालिका की भूमिका: "उत्तराखण्ड उच्च न्यायालय के परिप्रेक्ष्य में"
डॉ० हेमा देवी–प्रो० राजेश्वरी पंत, नैनीताल || 175

43) भारत में नारी मानवाधिकार का स्वरूप
डॉ० प्रतिमा गुप्ता, वाराणसी। || 181

44) सूरदास की काव्य भाषा
डॉ. मेरी माइकेल, वरंगल तेलंगाणा | || 186

45) स्वामी विवेकानंद के विचारों में बौद्ध दर्शन
डॉ. सचिन मंदिलवार, अम्बिकापुर (छत्तीसगढ़) || 189

46) बड़े बांधों से उत्पन्न समस्यायें, कारण एवं निदान
डॉ. तोताराल पटेल, धरमपुरी, धार (म.प्र.) || 191

47) अध्यापक शिक्षा में मूल्य परक शिक्षा
धनराज व्ही. पाटील–डा. भारती भद्द, सेंधवा || 195

http://www.printingarea.blogspot.com www.vidyawarta.com/03

हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे ॥धृ॥
नांदोत सुखे गरिब-अमिर एक मतांनी
मग हिंदू असो, ख्रिश्चन वा, हो इस्लामी
स्वातंत्र्य सुखा या, सकळामाजि वसू दे दे, वरचि असा दे ॥१॥"

समाजातील विषमता, जातीयता नष्ट होवून सर्वच गुण्यागोविंदाने आणि सुखाने राहोत अशी विश्व प्रार्थना या भजनातून महाराज करतांना दिसतात. लोक संगीताची निर्मिती ही सांघिक पुनर्निर्मीती असते. त्यातील सामुहिकता अत्यंत व्यापक स्वरुपाची आहे. कारण लोक संगीतातील 'लोक' या एका शब्दातूनच सामुहिकतेचे दर्शन आपल्याला घडते, ती सांघिक पुनर्निर्मीतीच असते. कारण जनमाणसात आकार घेतलेले किंवा वातावरणात भरलेल्या गीतात किंवा संगीतात प्रत्येकजन आप-आपल्या परीने काटछाट करुन किंवा वाढवून त्याला पुन्हा-पुन्हा सादर करीत असतो.

लोक संगीतात मोजकेच वाद्य वा मोजकेच संगीत असल्याचे दिसुन येते. म्हणजेच जरुरी असेल तेथेच वाद्य वाजविले जातात. उदा. अंगाई गीतासोबत कोणत्याही वाद्याच्या साथीची कल्पना आपण करु शकत नाही परंतू लावणी बरोबर वाद्याची साथसंगत नाही असे कधीच होऊ शकत नाही. म्हणजेच अतिशय सुचक व समर्पक अशी वाद्यांची साथ संगत लोक संगीतात आपल्याला आढळून येते. लोक संगीतात कलाकाराकडून सृजन घडत असले तरी त्यात लोकचेतनेचा अंश हा असतोच. जेव्हा हा अंश अधिक प्रभावी असतो तेव्हा ती 'लोक' ची अभिव्यक्ती असते. म्हणूनच लोकसंगीत हे लोकांच्या एकंदर जीवनाचे अंग असते असे म्हणता येईल. लोकसंगीताची 'लोक' आणि 'लोकात्म' भावना ही समाजाच्या जडण-घडणीच्या दृष्टीने अत्यंत मौलाची आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. भारताचे संविधान, २००६ (सहावी आवृत्ती), संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, उद्देशिका.
२. आचार्य दीनबंधु गुरुजी (संकलन व अनुवाद), १९६२ बौद्ध नित्य पुजापाठ, तथागत प्रकाशन, भीमनगर, अकोला, पृ.क्र.५.
३. वसंत (लेखक), डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग (संपादक), २००४ (पंचविसवी संस्करण), संगीत विशारद, संगीत कार्यालय हाथरस, (भारत), पृ.क्र.५७५.
४. चौधरी बहिणाबाई, २०१० (पंधरावी आवृत्ती), बहिणाबाईची गाणी, सुचित्रा प्रकाशन, मुंबई, पृ.क्र.५७.
५. रानडे अशोक दामोदर, १९७५, लोकसंगीतशास्त्र, भारत मुद्रक आणि प्रकाशन लि., औरंगाबाद, पृ.क्र.१५.


❑❑❑

**36**

# 'लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या दलित आत्मकथनातील समाजदर्शन


प्रा.डॉ. सौ. वंदना वि. नढे
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर जि.पुणे


**********

डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या प्रेरणेमुळे दलि समाजात शिक्षणाचे महत्व पटू लागले. सुशिक्षित दलि पिढी स्वत:विषयी विचार करू लागली. स्वत अनुभवलेल्या व्यथा—वेदनांमुळे त्यांच्यात आत्मभा जागश्त होऊ लागले. त्यांनी ते निर्भिडपणे साहित्यात मांडण्यास सुरूवात केली. यातून दलित आत्मकथ जन्माला आले.

जीवन जगताना ज्याला माणूस म्हणून जगण्या अधिकार नाकारले गेले तो दलित माणूस समाजाती कटू अनुभव या आत्मकथनातून व्यक्त करू लागल त्यांनी आपले वास्तव चित्रण केले. या आत्मकथनातू समाजजीवनामुळे निर्माण झालेले प्रश्न, समाज व्यवस्थे लादलेली दु:खे, समाज व्यवस्थेतील विषमता, अमानव कृत्ये तसेच गावगाडयातील समाज व गाव कुसाबाहेरील समाज यांच्यातील संघर्ष यांचे दर्शन घडू लागले य आत्मकथनाच्या निमित्ताने पुन्हा गत स्मृतींना उजाळ त्याचे दु:खी मन, शोषित मन बंड करून उठते.

लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या आत्मकथनातह याचा प्रत्यय येतो. यात त्यांनी कैकाडी समाजाच व्यथा मांडली. महाराष्ट्र, कर्नाटक या विभागात आढळणारी ही जमतात समत भटकंती करून स्वत:चे जीवन जगतात. लेखकाची आई—वडीलही गावोगाव हिंडून टोपल्या कुंचे, केरसुन्या विकून मिळेल ते शिळे अन्न खाऊन दिवस काढतात. त्या तुटपूंज्या कमाईमध्ये कुटूंबातील लोकांचे कसे बसे भागवतात. तरीही देवधर्म, विधी, शिक्षणाची आवड या सर्व गोष्टी निभवुन नेतात. या सर्वात त्यांच्या जीवाची झालेली

चालमेल ओढतान या सर्वांचे विदारक चित्रण यात लेखकाने मांडले.

या आत्मकथनाचे नाव 'उपरा' याचा शब्दकोशातील अर्थ—

उपरा— १)'मोसम', २)'बहार', ३)'आगंतुक' हा आहे. यात 'आगंतुक' म्हणजे न बोलवता जेवण्यास गेलेला मनुष्य होय.

या आत्मकथेला हे शिर्षक समर्पक आहे. कारण लेखकाचा एकाठिकाणी वास्तव्य नाही. जिथे पोटाचे प्रश्न सुटतात तेथे ते जातात. या आत्मकथनात त्यांनी कैकाडी समाजातील माणसाचे जीवनच रेखाटले आहे ते असे.

**१) प्रथा, परंपराचे जतन—**

पोटाला जेवायला नसलेतरी चालेल परंतु देवाचे सोपस्कर ते व्यवस्थित पाळतात. म्हणून अंघोळ करून देवाची पुजा करतात. (पृ.१४)

उदा.चैत्रात काळूबाई डुकर किंवा बकरी कापणे. (पृ.२०, २३), सटवाईला डुकरे कापण्याची प्रथा कोंबडया असते. (पृ.४९,२७,३०), श्रावणी सोमवारी देवदेव करणे. (पृ.४३)

**२) अज्ञान अंधश्रध्दा—**

हे लोक एका गावावरून दुसऱ्या गावाला जाताना, प्रवासात, मुक्कामाच्या ठिकाणी सतत देवीचे नाव घेतात. (पृ.११), समीला अचानक ताप भरून तिची दातखिली बसते. तिला देवाचा अंगारा लावला जातो, (पृ.१५), जंगलाते फोकाबरोबर साप कापला म्हणून घाबरलेला 'बा' देवाचे नाव घेऊन अंगारा लावतो. पिंगळयाचे पोट दुखते म्हणून, अंगारा देतो, औषध देतो. (पृ.५८), अप्पांची अजगरापासून सुटका होते म्हणून अशा प्रत्येक ठिकाणी कैकाडी समाजाचे अज्ञान व अंधश्रध्दा दिसून येते.

**३) गरीब पण, स्वाभिमानी, मान सन्मानाचा विचार—**

ही जमात पोटापाण्यासाठी गावोगाव फिरतात परंतु यात्रेनिमित्त पुन्हा आपल्या गावी येतात. आपले निरगुडी हे गाव कसे याबाबत सांगताना ते सर्व इतिहास सांगतात व आपण येथे वतनदार कसे झालो ते अभिमानाने सांगतात. (पृ.२५), तसेच चैत्रातील काळूबाईच्या यात्रेला आपला मान हे सांगताना, 'ते म्हणतात, 'कैकाडयांची बिराड देवीच्या म्होरच्या बाजूला कैकाडयाचा जत्रंच मान, मानकऱ्यांची बिऱ्हाड देवीला लागून (पृ.२९) अशा रितीने कष्ट करून, अपाशी राहून ते जमातीत व समाजात स्वाभिमानाने जगताना दिसतात.

**४) आधाराची, माणुसकीची भावना—**

हया समाजाला गावात केरसुण्या, टोपल्या, कुंचे विकल्यावर स्त्री वर्गाला गावातील स्त्रियांकडून कालवणासाठी किडूक मिडूक भेटते. (पृ.१५) तसेच जातीतही एखादयावर बाकाप्रसंग आल्यावर हे लोक आधार देताना दिसतात.

उदा.पारूला आधार (पृ.५६), म्हाताऱ्याला आधार (पृ.२२), यात्रेनिमित्त किंवा जीवनात एकमेकांना आधार दिला पाहिजे म्हणून भावंडाना सांभाळून घेतात.(पृ.२८)

शहरात त्यांना डॉ.दाभोळकर थत्ते, त्यांना भेटलेले अनेक शिक्षक, समाज, कार्यकर्ते असे अनेक जण वेळप्रसंगी लेखकाला आधार देतात. यावरून समाजातील लोक हताश, निराशात्मक स्थिती लेखाकाचा ही मंडळी आधार झाल्याने लेखकाला जीवनात यश संपादन करणे सोपे झाले.

**५) अवहेलना—**

ग्रामीण भागात मात्र जुन्या विचारांचा प्रभाव दिसतो. डॉ.बाबासाहेबांच्या विचारांनी ते प्रभावित होत नाही. उलट जातीला लक्ष्य करून त्यांना मारझोड, वाळीत टाकणे किंवा गावाबाहेर हाकलून लावणे असे प्रकार होतात. उदा.शेतात माडवं गेली म्हणून (पृ.७), शेतातील बांधावरणे हिरवा ढाळा कापला म्हणून मरेपर्यंत मार (पृ.३८) खातात.

उदा.गाव सोडून जाताना दगडया रामोशी 'साऱ्या बिऱ्हाडाचा झाडा घ्यायचा, तुमचा काय नेम? कुणाचं काय नेत असाल तर?' (पृ.१२) असे म्हणून त्यांचे सामान उचकतो.

उदा.गावात चोरी कोन करतो पण मार मात्र कैकाडी खात. पाटलाचे विहीरीचे इंजिन चोरीला गेले म्हणून त्यांना मरेपर्यंत मारतात. अशा रितीने सतत कैकाडी लोकांची काहीतरी कारणाने अवहेलना केली जाते.

## ६) स्त्री विषयक भूमिका–

सटवाई किंवा डुकराचं जेवण असेल तेथे स्त्रियांना मान नाही (पृ.२३) स्त्रियांनी नटणे, मुरडणे, रोज अंघोळ करणे, परत संध्याकाळी लवकर घरी जाणे, फिरून बोलणे नाही, असे अनेक निर्बंध स्त्रियांवर घातली जातात.

तसेच स्त्री म्हणजे योगाची, वासनेची शिकार म्हणून रात्री त्यांना उचलून नेऊन त्यांचे लैगिंक शोषण होताना दिसते (पृ.५६), पिंगळयाची बायको त्याला औषध आणायला जाते. तिच्यावर संशय घेऊन तिला खूप मारतो (पृ.५८) होलार वस्तीत ही बायकोला मारतो (पृ.१५२) बायकां म्हणजे पायातील वाहाण. अशी त्यांना वागणूक पुरूषांकडून दिली जाते. म्हणून एक वेगळया नजरेने लेखकाच्या आईकडे बघून हसतो. (पृ.१२) परंतु समाजात पुरूष प्रधान संस्कृती असल्याने उच्च वर्गात काय किंवा अशा भटक्या जमातीत काय स्त्रियांना दुय्यमच स्थान मिळालेले दिसते.

## ७) स्पृश्य–अस्पृश्यतेचा विचार–

गावात लग्न असेल कि कामासाठी यांची गरज भासते पण जेवणाची वेळ आली तर यांना पोटभर जेवण कुणी वाढीत नाही. यांना लग्न मंडपाच्या बाहेर जिथे पत्रावळी टाकतात म्हणजे उकिरडयावर बसून जेवणाची वाट बघावी लागते. यांचा स्पर्श होऊ नये म्हणून वरून जेवण टाकले जाते, पत्रावळ स्वत:च स्वत:ची घ्यावी लागते, जेवणही हाका मारून मागावे लागते (पृ.४१,३७) एकदा असेच लेखकाडून टिपाला स्पर्श झाला म्हणून व जेवनाच्या पंगतीत बसला म्हणून (पृ.७३,७७) बेदम मार खावा लागला होता. यावरून त्यांना मारताना त्यांना स्पर्श झालेला यांना चालतो पण माणूस म्हणून त्यांचा स्पर्श चालत नाही.

## ८) उदरनिर्वाहाचा प्रश्न–

यांना गावात दारोदारी जाऊन अन्न मागावे लागते पण त्यात शिळे, वास वाले अन्न त्यांच्या वाटयाला येते किंवा उष्ट *विळीवर जाऊन पत्रावळीतील* खटकटे, उष्टे अन्न त्यांना न्यावे लागते ते उन्हात चांगले वाळवून त्यावर दोन दिवसांची गुजरण करावी लागते. उदा.लेखक स्वत: लहान भावंडासाठी– 'हातात वाट कं घेतलं आन दारोदार भाकरी वाढ, ग माई, शिळं पाक वाढा गं काकू", (पृ.१७) म्हणून फिरू लागले.

तसेच पोटाची खळगी भरण्यासाठी सुट्टीत लग्न सिझनला ते बँड वाजवून शाळेचा, जेवणाचा प्रश्न सोडवत होते. (पृ.३६, ४१, ६१, ७७) अशा प्रकारे लेखकाने अनेक कष्ट करून आपला व कुटूंबाचा उदरनिर्वाह केला.

## ९) व्यसनाधीनता–

देवाचा प्रसाद म्हणून, जत्रेत, यात्रेत निमित्ताने दारू पिणे, आनंद साजरा करायला दारू, लग्नात दारू, सटवाईच्या पुजेला दारू पिणे, अशा वेगवेगळया कारणांनी ही जमात मनावरील ताण दारू पिऊन कमी करताना दिसतात. (पृ.२१, ४९, ५६)

## १०) अगतिक, लाचार जगने–

लेखक शाळेत जात होते पण शर्ट होती तर त्यांना पॅट नव्हती म्हणून मुले त्यांना चिडवित होते. त्यांचे शर्ट वर करून हसत होते.(पृ.७)

शाळेत जाताना पाटी, पेन्सिल, पुस्तक नाही. खालच्या जातीचे म्हणुन भाडयाने घर नाही, १०–१२ वीला शाळे व्यतिरिक्त क्लास नाही. नोकरी नाही.(पृ. ७४) भाडयाच्या घरात खोटे सांगून ते राहात होते.

असे अनेक अपमानित प्रसंगांना त्यांना सामोरे जावे लागत होते.

## ११) देवभोळेपणा–

लेखकाचे वडील अशिक्षित असल्याने अंगारा, धुपारा, देवऋषीपण करणे, भूत खेत काढणे, अंगात येणे, या सारख्या गोष्टी करतात. त्याच प्रमाणे पायऱ्या दगडांवर पाच दगड प्रत्येकाने श्रध्देने टाकणे, सटवाईचे जेवण परत गावात न नेणे योग्य नाही, सटवाईचे करायला जाताना मागे वळून न पाहणे अशा अनेक गोष्टी हे लोक देवावरच्या श्रध्दे, पोटी करताना दिसतात. (पृ.१४, १६, ३१, २६, ४३)

## १२) औषधोपचारांबाबत अज्ञान–

घरात कुणी आजारी पडले, पोट दुखले, दातखिली बसली, बांळतपणातही हे औषधोपचार करीत नाहीत उलट देवीच्या अंगाऱ्यावर विश्वास ठेवून ते त्या रोग्याला लावताना दिसतात.

## १३) लग्न व्यवस्था–

या जमातीत जत्रेच्या निमित्ताने एकत्र